शोधप्रबंधाचा प्रस्तावित आराखडा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या मानवविज्ञान विद्याशाखे अंतर्गत **समाजशास्त्र** विषयातील **विद्यावाचस्पती (पीएच.डी)** पदवीसाठी सादर करावयाचा संशोधन पूर्व आराखडा

संशोधन विषय

अनुसूचीत जमातीतील पदवीच्या विद्यार्थ्यांच्या सामाजिक,आर्थिक व शैक्षणिक स्थितीचा समाजशास्त्रीय अभ्यास (विशेष संदर्भ नांदेड जिल्हा)

संशोधक

सचिन मावलीकर

एम.ए (समाजशास्त्र)

संशोधक मार्गदर्शक

डॉ.भिसे रामचंद्र मुंजाजी

(एम.ए,एम.फिल,पीएच.डी,नेट)

समाजशास्त्र विभाग प्रमुख,

दिगंबरराव बिंदू कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय भोकर जि.नांदेड

संशोधन केंद्र

सामाजिकशास्त्रे संकुल, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड.

सप्टेंबर 2023

अनुसूचीत जमातीतील पदवीच्या विद्यार्थ्यांच्या सामाजिक,आर्थिक व शैक्षणिक स्थितीचा समाजशास्त्रीय अभ्यास (विशेष संदर्भ नांदेड जिल्हा)

अनुक्रमणिका

1.1 प्रस्तावना : 1

1.2 समस्या व स्वरूप :..8

1.3 संशोधनाची उदिष्टे : 9

1.4 संशोधनाचे गृहितकृत्ये : 10

1.5 संशोधन व्याप्ती व कालावधी : 11

1.6 संशोधन पद्धती : 11

1.7 सैद्धांतिक आधार : 11

1.8 नमुना निवड पद्धती : 12

1.9 तथ्य संकलनाचे स्त्रोत : 12

1.10 तथ्य विश्लेषण : 13

1.11 संशोधनाची रूपरेषा : 13

1.1 प्रस्तावना :

अनुसूचित जमातींना आदिवासी, मूलनिवासी, आदिम जाती व टोळ्या, वन्यजाती व गिरिजन अशी वेगवेगळी नावे आहेत.त्यांपैकी‘आदिवासी’हे नाव राष्ट्रीय परिभाषेत अधिक प्रचलित आहे. आदिवासी आणि इंडिजिनेअस शब्दाचा अर्थ समान असून ज्याचा अर्थ ‘इंडिजिनेअस' हा लॅटिन शब्द ‘इंडिजेना' शब्दातून आला 'मूळचा देश' किंवा 'जमिनीपासून उगवला' असा होतो. तर 'आदिवासी' म्हणजे अगदी पहिला मानव, माता पृथ्वीपासून उगवलेला असा अर्थबोध होतो. इंडिजिनेअस या शब्दाला संयुक्त राष्ट्र संघाची मान्यता आहे. राज्यघटनेत 'अनुसूचित जमाती ' हा शब्द आदिवासींसाठी वापरण्यात आला आहे.असं असताना अनेक आदिवासी ९ ऑगस्ट हा दिवस जागतिक आदिवासी दिवस आणि १३ सप्टेंबर जागतिक आदिवासी अधिकार दिवस म्हणून साजरा करतात.

जगातील काही आदिवासी जमाती :

मोरो लोक (मुस्लिम फिलिपिनो) : जेथे अस्तित्वात होते त्यांना बांगसामोरो प्रदेश असे म्हणतात.ते सतत स्थलांतराच्या अधीन आहेत आणि म्हणूनच ते फिलीपिन्समधील मनिला, सेबू आणि दावो सिटी या सर्व शहरांमध्ये आढळतात. 20 व्या शतकाच्या शेवटच्या सहामाहीत, अनेक मोरो मलेशिया, इंडोनेशिया आणि ब्रुनेई येथे स्थलांतरित झाले आहेत.

पिग्मीज : पिग्मी हे आफ्रिकेतील झैरे बेसिनमधील अत्यंत लहान आकाराचे लोक आहेत.

रेड इंडियन्स : रेड इंडियन हे उत्तर अमेरिकेतील आदिवासी आहेत.

स्वाहिली : स्वाहिली हा केनिया आणि टांझानियामधील आदिवासींचा समूह आहे

टार्टर : टार्टर म्हणजे सायबेरियातील लोकांच्या मिश्र गट.

तेन्हारीम : तेनहारिम हे ब्राझीलचे स्थानिक लोक आहेत, जे अमेझोन राज्यात राहतात.

याकुट्स : याकुट्स हे रशियातील टुंड्रा प्रदेशातील लोक आहेत.

झुलुस : झुलू हा दक्षिण आफ्रिकेतील सर्वात मोठा वांशिक गट आहे, अंदाजे 10-11 दशलक्ष लोक प्रामुख्याने क्वाझुलु-नताल प्रांतात राहतात. झिम्बाब्वे, झांबिया आणि मोझांबिकमध्येही लहान लोक राहतात. त्यांची भाषा, झुलू ही बंटू भाषा आहे.

भारतातील काही आदिवासी जमाती :

भारतात तेलंगणा,आंध्रप्रदेश,छत्तीसगड,आसम,मिजोरम इत्यादी भागात आदिवासी जमाती आढळतात. भारतातील प्रमुख आदिवासी समुदाय म्हणजे आंध, गोंड, खरवार, मुंडा, खाडिया, बोडो, कोल, भील, कोळी, सहारिया, संथाल, भूमिज, ओराव, लोहरा, बिरहोर, पारधी, असुर, भील, भिलाला, मीना, टाकर इत्यादी.

महाराष्ट्रातील आदिवासी जमाती :

भिल्ल, गोंड, महादेव कोळी, पावरा, ठाकूर, वारली या प्रमुख आदिवासी जमाती आहेत. कोलाम (यवतमाळ जिल्हा), कातकरी (मुख्यत: रायगड व ठाणे जिल्हा) आणि माडिया गोंड (गडचिरोली जिल्हा) या केंद्र शासनाने आदिम जमाती म्हणून अधिसूचित केलेल्या अशा तीन जमाती आहेत. राज्यात एकूण 35 जिल्हे आहेत आणि आदिवासींची संख्या मोठया प्रमाणात धुळे, नंदूरबार, जळगांव, नाशिक व ठाणे (सहयाद्री प्रदेश) चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, नागपूर, अमरावती व यवतमाळ (गोंडवन प्रदेश) या पूर्वेकडील वनाच्छादित जिल्हयांमध्ये मुख्यत: अधिक आहे.

नांदेड जिल्ह्यातील आदिवासी जमाती :

किनवट तालुक्यात ,पैनगंगेच्या तिरावर निसर्गरम्य अश्या घनदाट जंगलात आणि गिरिकुहरातून आदिवासींची वस्ती पहायला मिळते. आदिवासी जमातींपैकी गोंड, आंध, पारधी, भिल्ल, कोलाम,फासेपारधी यांचे तांडे आणि खेडी मोठ्या प्रमाणात आहेत. या जमाती त्यांच्या मुळ भाषेचाच वापर बोली भाषा म्हणून करित असले तरिही त्यांच्या भाषेवर मराठी आणि तेलगू भाषेचा काही प्रमाणात प्रभाव पाहायला मिळतो.

आदिवासींच्या सामाजिक,आर्थिक व शैक्षणिक विकासाच्या हेतूने 1983 साली आदिवासी विकास विभागाची निर्मिती करण्यात आली असून सन 1992 मध्ये पुनर्रचना करून महाराष्ट्र शासनाने ह्या विभागाअंतर्गत 24 प्रकल्पांची निर्मिती केली. किनवट प्रकल्प हा त्यापैकीच एक. किनवट प्रकल्पामध्ये संपूर्ण नांदेड जिल्ह्याचा समावेश आहे. एकून लोकसंख्येपैकी आदिवासी लोकसंख्येची टक्केवारी 8.82% एवढी आहे. नांदेड जिल्ह्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रात (TSP) किनवट व माहूर या दोन तालुक्यांचा समावेश आहे तर हिमायतनगर, भोकर व हदगाव हे तालुके OTSP क्षेत्रात असून विखुरलेल्या आदिवासी बांधवांच्या हितासाठी काम करते.

सामाजिक परिस्थिती :

विवाहाचे आणि कुटुंबाचेही अनेक प्रकार आदिवासी जमातींत आढळून येतात. वयात आलेले तरुण आणि तरुणी एकमेकांच्या संमतीने विवाहबद्ध होतात. हा सर्वसामान्य प्रकार झाला.शिवाय आपल्याला पसंत असलेल्या मुलीला पळवून नेऊन विवाह करणे, तसेच एखाद्या मुलीला एखादा मुलगा पसंत पडला तर तिने त्याच्या घरात जाऊन बसणे आणि लग्नाला संमती मिळाल्याशिवाय बाहेर न जाणे (अशा मुलीला महाराष्ट्रात 'घरघुशी' म्हणतात) इ.प्रकारची आढळून येतात.

भारतीय आदिवासींमध्ये पितृप्रधान-पितृवंशीय आणि मातृप्रधान-मांतृवंशीय हे दोन्ही प्रकार कुटुंबाच्या बाबातीत रूढ आहेत. तसेच बहुपत्नीकत्व आणि बहुपतिकत्व हेही दिसून येतात. बहुपतिकत्वामध्ये भ्रातृक-बहुपतिकत्व म्हणजे भावाभावांमध्ये सामायिक पत्नी असणे आणि अभ्रातृक-बहुपतिकत्व म्हणजे पत्नी सामायिक परंतु पती वेगवेगळया कुटुंबांतील असणे, असे दोन प्रकार आहेत. भ्रातृक-बहुपतिकत्व हे पितृप्राधान कुटुंबांतच शक्य आहे आणि ही पद्धत उत्तरेत खस आणि दक्षिणेत तोडा जमातींत दिसून येते. ईशान्येत खासी, गोरा आणि नागा लोकांच्या काही शाखांतून मातृप्रधान कुटुंबपद्धती आहे. परंतु बहुपतिकत्व नाही. केरळमधील नायर ह्या बिगर आदिवासी जमातीत मातृप्रधान कुटुंबपद्धतीबरोबर अभ्रातृक- बहुपतिकत्व रूढ होते.लैंगिक नीती आणि विवाहनीती या बाबतींत आदिवासींची काही मूल्ये आणि पद्धती अगदी स्वतंत्र आहेत.

आर्थिक स्वातंत्र्य अगर स्वालंबन, विवाह जमविण्याचे आणि मोडण्याचे स्वातंत्र्य, वैयक्तिक मालमत्तेचे स्वातंत्र्य, विवाहपूर्व लैंगिक स्वातंत्र्य व सामाजिक जीवनातील दैनंदिन व्यवहारामध्ये मुक्त संचार ही आदिवासी समाजातील स्त्रीच्या स्थानाची वैशिष्टये जवळजवळ सर्वच आदिवासींमध्ये दिसून येतात.भारतीय आदिवासी हे भारतीय बिगर आदिवासींच्या संपर्कापासून नेहमी अलिप्तच राहिले होते, असे नव्हे. ऐतिहासिक आणि इतिहासपूर्व काळात इतरांशी त्यांचा संबंध आल्याचे दाखले सापडतात. सामाजिक कल्याणविषयक योजनांत दळणवळण, आरोग्य, शिक्षण आणि घरबांधणी हे विषय येतात. दूर आणि दुर्गम ठिकाणांमुळे तुटलेल्या आदिवासी जमातींसाठी दळणवळण आणि वाहतुकीचे रस्ते ही एक अत्यावश्यक गरज आहे. आतापर्यंत सर्व पंचवार्षिक योजनांमध्ये अनुसूचित प्रदेशांत रस्ते बांधण्याकडे अधिकाधिक लक्ष पुरविले गेले आहे.

आर्थिक परिस्थिती :

आदिवासी-अर्थव्यवस्थेत जमीन आणि जंगल यांना अधिक महत्त्व असते किंबहुना त्याशिवाय त्यांचे जीवनच असाध्य आणि असह्य होते. परंतु जमीन आणि जंगल यांच्या उपयोगाच्या पद्धतीत मात्र सर्व आदिवासी सारखे नाहीत. बहुसंख्य आदिवासींचे उपजीविकेचे साधन शेती हेच आहे. परंतु स्थालांतर-शेतीची जुनी पद्धत

आजही काही जमातींमध्ये शिल्लक आहे. दर दोनतीन वर्षांनी जंगलांतील नव्या नव्या जमिनीचे तुकडे याकरिता निवडले जात असल्यामुळे या पद्धतीने जंगल क्रमशः नष्ट होत जाते आणि जमीनही कालांतराने निकृष्ट बनत जाते. ही पद्धत आंध्र प्रदेश, आसाम, ओरिसा, बिहार, मध्यप्रदेश आणि महाराष्ट्र या राज्यांतील काही जमातींमध्ये प्रचलित आहे. या पद्धतीला आसामामध्ये झूम, ओरिसामध्ये पोडू, मध्यप्रदेश बेवार आणि महाराष्ट्रात राब अशी नावे आहेत. भारतातील एकूण आदिवासींपैकी अंदाजे १० टक्के लोक स्थलांतर-शेतीच अजून करतात.शिकार हेसुद्धा काही जमातींचे उपजीविकेचे साधन आहे.अनेक आदिवासी जमाती ह्या विविध कारागिरींत आणि हस्तकौशल्यांतही नावाजलेल्या होत्या. हातमागावर कापड विणण्यात नागा जमात टोपल्या, चटया, दोऱ्या, वाद्ये आणि शस्त्रास्त्रे बनवण्यात थारूआ जमात व लोहारकाम, सुतारकाम आणि कुंभारकाम यांत कोटा जमात कोरीव लाकडी आणि बांबूकाम करण्यात गोंड आणि बैगा ह्या जमाती प्रसिद्ध होत्या.

आजही ही कारागिरी त्यांच्यात दिसून येते. शासनाच्या जंगलसंरक्षण धोरणाच्या अतिरेकामुळे आदिवासींना त्यांच्या पारंपरिक अशा अनेक हक्कांना मुकावे लागले. आहे ती जंगल-संपत्ती टिकविणे व कायदा आणि सुव्यवस्था राखणे, या धोरणामुळे आदिवासींच्या निरक्षरतेचा, अज्ञानाचा आणि दुबळेपणाचा फायदा जमीनदार, सावकार, जंगल-कंत्राटदार, दलाल इत्यादींनी घेतला. जंगल आणि जमीन ही त्यांची उदरनिर्वाहाची साधने या वर्गांनी बळकावली. व्यापारी वृत्तीच्या आधुनिक अर्थव्यवस्थेत आदिवासी खेचले जाऊन वेठ-बिगारी, दारिद्र्य, कर्ज, दारू यांच्या चक्रात ते सापडले. स्वयंपूर्ण आर्थिक जीवन नष्ट झाल्यामुळे आणि जमीन-जंगलाला वंचित झाल्यामुळे, छोटा नागपूर, संथाळ परगणे, मध्य प्रदेश आणि बिहार येथे १९व्या आणि २०व्या शतकांत आदिवासींची लहानमोठी बंडे झाली कायद्याच्या आंधळया कारभारामुळे त्याच्या राजकीय व सामाजिक जीवनातील अंतर्गत एकात्मताही भंग पावली.

१९३१च्या जनगणनेप्रमाणे आदिवासींमधील साक्षरता ०·७ टक्केच होती. १९३५च्या अधिनियमास अनुसरून बनलेल्या निरनिराळ्या प्रांतीय विधिमंडळांतही अतिशय अपुरे (१·६ टक्के) प्रतिनिधित्व त्यांच्या वाट्यास आले. सारंश, ब्रिटिश अमदानीत आदिवासींच्या आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाची पूर्ण विघटना झाली. शिक्षणाचा अभाव, तुटपुंजी प्राप्ती, दारू, तंबाखू आणि सण-समारंभावरील अप्रमाण खर्च ही त्यांची प्रमुख कारणे आहेत. सावकारी प्रतिबंध कायदे आणि कर्जमुक्तीच्या योजना काही राज्यांत आहेत. सहकारी पतपेढ्यांमार्फतही सावकाराची आवश्यकता कमी करण्याचे प्रयत्न चालू आहेत. परंतु त्यांचा अजून प्रभाव पडलेला नाही.

आरोग्याबाबतचे आदिवासींचे प्रश्न हे मुख्यतः पिण्याच्या पाण्याची टंचाई, अतिरिक्त दारूच्या व्यसनाचे दुष्परिणाम आणि मलेरियासारख्या रोगांचा प्रदुर्भाव हे आहेत. काही जमातींमध्ये गुप्त रोगही अधिक प्रमाणात दिसून येतात. दवाखाने, फिरते दवाखाने, मलेरिया नियंत्रण केंद्रे, प्रसुतिगृहे आणि बालकल्याण केंद्रे यांच्या तजविजा योजनांत केल्या गेल्या आहेत.दारू हा आदिवासींच्या कौटुंबिक खर्चाचा एक भाग असून, त्या व्यसनाने

आदिवासींचा शारीरिक ऱ्हास झाला आहे, यात शंका नाही. महाराष्ट्र आणि तामिळनाडूमध्ये कायद्याने आदिवासी-भागांतही संपूर्ण दारूबंदी आहे. तथापि काही आदिवासींमध्ये देशी दारूला धार्मिक विधींत महत्त्वाचे स्थान आहे.

शैक्षणिक परिस्थिती :

१९६१ च्या जनगणनेनुसार आदिवासींतील साक्षरतेचे प्रमाण फक्त ८·४ टक्के आहे. बाकीच्या भारतातील साक्षरतेचे प्रमाण २२·४ टक्के आहे. आदिवासींचा आर्थिक विकास शैक्षणिक प्रगतीशी अविभाज्यापणे निगडित असल्यामुळे स्वातंत्र्योत्तर काळात सरकारने या क्षेत्रात खूप सवलती देऊ केल्या आहेत. सर्व अवस्थांतील मोफत शिक्षण, प्राथमिक शिक्षणासाठी आश्रमशाळा, सेवाश्रमशाळा, मोफत पुस्तकांची सोय, बालवाड्या, माध्यमिक शाळांसाठी वसतिगृहे आदिवासी शाळांना बिगर आदिवासी शिक्षक मिळत नाहीत अगर नाखूष असतात म्हणून अशा ठिकाणी तिथलेच शिक्षक शक्य तो नेमणे व त्यासाठी त्यांना अधिक सवलती देणे प्रशिक्षण, निःशुल्क रेडिओ, धंदे व तंत्रशिक्षणाच्या शाळा काढणे सरकारी शाळांतून ५ टक्के जागा राखीव ठेवणे राज्य सरकारच्या मॅट्रिकपूर्व व केंद्र सरकारच्या महाविद्यालयीन शिक्षणासाठी शिष्यवृत्त्या देणे इ. मार्गांनी सरकारी प्रयत्न कार्यान्वित होत आहेत. सु. ६०० आश्रमशाळा विविध राज्यातून चालू आहेत. पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्या पंचवार्षिक योजनांत शिक्षणासाठी राज्य व केंद्र सरकारने ‘जनरल सेक्टर स्कीम’ खाली अनुक्रमे ५१०·३४ लाख, ८१६·५५ लाख आणि ९४६·६१ लाख रुपयांची तरतूद केली होती· याव्यतिरिक्त शालान्त परीक्षेनंतरच्या शिष्यवृत्त्यांकरिता तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात १९६४-६५ सालअखेरपर्यंत एकूण १९२·०४ लक्ष रुपये खर्च झाले आहेत आणि एकूण शिष्यवृत्त्यांची संख्या ४३,७४१ होती.

१९४८-४९ सालापासून १९६४-६५ अखेरपर्यंत एकूण १,३८,४३९ शिष्यवृत्त्या दिल्या गेल्या आणि त्यांवर एकूण ३४९·३२ लक्ष रुपये खर्च झाले.असे असूनही आदिवासींच्या शिक्षणात अपव्यायाचा व कुंठिततेचा भाग बराच आहे. आदिवासी कुटुंबांत मुले लहान वयापासून आर्थिक जबाबदारीची कामे करू लागतात. म्हणून मुलांना शाळेत पाठविणे हे आदिवासींना जड जाते. माध्यमिक शिक्षणाची पातळी अजून फार निकृष्ट आहे.मैदानी प्रदेशांतील हिंदू आणि ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या सहवासामुळे प्रगत झालेले विभाग सोडले, तर दारिद्र्यामुळे शिक्षण नाही आणि शिक्षणाभावी दारिद्र्यातून सुटका नाही.

तसेच अनुसूचीत जमातीमधील बहुतांश मुले ही उच्च शिक्षणापासून वंचित राहत आहेत.खूप कमी प्रमाणात ही मुले प्राथमिक व माध्यमिक शिक्षण घेतात व नंतर पुढील उच्च शिक्षण घेन्यामध्ये देखील खूप कमी प्रमाण आहे.शिक्षण हेच अनुसूचीत जमातीला समजाच्या प्रवाहा बरोबर आनेल व तसेच समजाचा सर्वांगीण विकास करून देईल.

1.2 समस्या व स्वरूप :

अनुसूचीत जमतीचा समावेश दुर्बल समाजघटकात केला जातो.बहुतांश अनुसूचीत जमाती या सामाजिक,आर्थिक,शैक्षणिक रित्या मागसलेल्या अवस्थेत जीवन जगत आहेत.या जमतीतील लोक हे समजाच्या प्रवाहापासून दूर होते पण आता वाढत्या जागतिकीकरणामुळे अनुसूचीत जमातीतील लोक हे प्रवाहामध्ये येत आहेत.कोणताही समाज हा तेंव्हाच प्रगति करू शकतो ज्या वेळेस त्या समाजातील युवा वर्ग शिक्षणाच्या प्रवाहात असेल शिक्षण ही समजाच्या विकसाच दार उघडून देणारी गुरु किल्ली आहे.आदिवासी जमातीची भारतात एकूण लोकसंख्या ही 8.6% आहे व त्या लोकसंखेच्या 11% लोकसंख्या ही शिक्षणाच्या प्रवाहात आहे.हा आकडा अनुसूचीत जमातीचे शैक्षणिक दृष्ट्या मागासले पण दर्शवते.तसेच अनुसूचीत जमाती मधील पदविपर्यंत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ही इतर समाजा पेक्षा कमी आहे.

1.3 संशोधनाचे उदिष्टे :

1) अनुसूचीत जमातीतील पदवीत शिक्षण घेत असणाऱ्या विद्यार्थ्यांचा सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक परिस्थितीचा अभ्यास करणे.
2) अनुसूचीत जमातीतील पदवीत शिक्षण घेत असणाऱ्या विद्यार्थ्यांना मिळत असलेल्या शासकीय योजनांचा आढावा घेणे.
3) अनुसूचीत जमातीतील पारंपरिक व व्यावसायिक शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचा तौलनिक अभ्यास करणे.
4) अनुसूचीत जमातीतील पदवीत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचे प्रमाण किती आहे याचा आढावा घेणे.
5) अनुसूचीत जमातीतील पदवीत शिकत असलेल्या विद्यार्थी मुलांचे व मुलींचे प्रमाण किती आहे याचा आढावा घेणे.
6) अनुसूचीत जमाती मधील पदवीत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या कौटुंबिक परिस्थितीचा अभ्यास करणे.
7) अनुसूचीत जमाती मधील पदवीत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांच्या सामाजिक,आर्थिक व शैक्षणिक समस्या मांडणे व त्यावर उपाय सुचवणे.

1.4 संशोधनाची गृहितकृत्ये :

1) अनुसूचीत जमाती मधील शिक्षणाचे प्रमाण खूप कमी आहे त्यामुळे हा समाज आर्थिक तसेच सामाजिक रित्या मागास आहे.

2) शिक्षणासाठी पैसा महत्वाचा असतो व अनुसूचीत जमाती मधील बहुतांश लोकसंख्या ही गरीब असल्यामुळे विद्यार्थी ही शिक्षणापासून वंचित आहे.

3) अनुसूचीत जमाती मधील विद्यार्थ्यांचा कल हा शिक्षणापेक्षा पारंपरिक व्यावसायावर अधिक आहे जसे की शेती,शिकार,पशुपालन,मासेमारी इ.

4) अनुसूचीत जमाती मधील पदवीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी शासकीय योजना भेटत नाहीत.

5) अनुसूचीत जमाती मधील पदवीत शिकत असलेले विद्यार्थी हे व्यावसायिक शिक्षणा पेक्षा पारंपरिक शिक्षणा कडे कल दिसून येतो.

6) अनुसूचीत जमाती मधील पदवीत शिकत असलेले विद्यार्थ्यां पैकी मुलांची संख्या ही जास्त आहे व मुलींची संख्या ही कमी आहे.

7) अनुसूचीत जमाती मधील विद्यार्थ्यांना पारंपरिक शिक्षणा पेक्षा व्यावसायिक शिक्षण घेण्यात अडचणी येतात.

1.5 संशोधन अभ्यासाची व्याप्ती व कालावधी :

प्रस्तुत संशोधनात नांदेड जिल्ह्यातील अनुसूचीत जमातीमधील पदवीत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

संशोधनाचा कालावधी हा शैक्षणिक वर्षे 2024-25 व 2025-2026 मधील पदवीत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांशी संबंधित असेल

1.6 संशोधन पद्धती :

या संशोधनात गुणात्मक व संख्यात्मक या दोन्हीही संशोधन पद्धतीतीचा वापर करण्यात येणार आहे.

1.7 सैद्धांतिक आधार :

प्रस्तुत संशोधन हे समाजशास्त्रातील विविध शाखांपैकी आदिवासी समाजशास्त्र व शिक्षणाचे समाजशास्त्र या दोन शाखांशी संबंधित असून यातील मूलभूत संकल्पनांचा आधार घेऊन हे संशोधन पूर्ण केले जाईल.

1.8 नमुना निवड पद्धती

या संशोधनात नमुना निवडत असताना संभाव्यता नमूना निवड प्रकारातील सहेतुक नमुना निवड पद्धतीचा वापर केला जाईल.

1) संशोधनात पारंपरिक पदवी मध्ये बीए,बी.कॉम व बी.एससी आणि व्यावसायिक मध्ये मेडीकल(एम.बी.बी.एस,बी.ए.एम.एस,बी.डी.एस,बी.एच.एम.एस)बी.ई, बी.फार्मसी पदवी मधील विद्यार्थ्यांची निवड केली जाईल.
2) प्रस्तुत संशोधनात नांदेड जिल्ह्यातील विविध पदवी कॉलेज निवडून त्या मधील पारंपरिक बी.ए,बी.कॉम व बी.एससी मधील प्रत्येकी 50 विद्यार्थी आणि व्यावसायिक मधील मेडीकल(एम.बी.बी.एस,बी.ए.एम.एस,बी.डी.एस,बी.एच.एम.एस),बी.ई व बी.फार्मसी मधील प्रत्येकी 50 विद्यार्थी असे एकूण 300 नमुना निवडले जातील.

1.9 तथ्य संकलनाचे स्त्रोत

प्रस्तुत संशोधनात अभ्यासासाठी तथ्यपूर्ण,अचूक माहिती प्राप्त करण्याचा प्रयत्न केला जाईल.

प्राथमिक स्त्रोत :

संशोधनात उपयुक्त असलेली वास्तविक माहिती मिळवण्यासाठी पदवीत शिक्षण घेत असलेल्या अनुसूचीत जमातीतील विद्यार्थ्यांना भेट देऊन प्रश्नावली भरून घेतल्या जातील. प्रश्नावली चा वापर करून विविध निकष लावून महत्वपूर्ण माहिती मिळवण्याचा प्रयत्न केला जाईल.

दुय्यम स्त्रोत :

प्रस्तुत संशोधन अभ्यासनानाची पूर्ण करण्यासाठी आवश्यक ती माहिती मिळवण्यासाठी प्रकाशित व अप्रकाशित साहित्याचा वापर केला जाईल.संशोधन विषया संबंधित माहितीचे संकलन करण्यासाठी ग्रंथालयांना भेट देऊन माहिती मिळवली जाईल.

1.10 तथ्य विश्लेषण :

प्रस्तुत विषया संबंधित माहिती मिळवून या माहितीचे तथ्य पूर्ण सादरीकरण व विश्लेषण केले जाईल. तसेच या संशोधनात संगणकाच्या सॉफ्टवेअर चा वापर करण्यात येईल.

1.11 संशोधन अहवालाची रूपरेषा

प्रस्तुत संशोधन अहवालाची प्रकरण रचना पुढील प्रमाणे दिली आहे

प्रकरण पहिले : प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरणात अनुसूचीत जमाती म्हणजे काय,अनुसूचीत जमाती कुठे कुठे आढळतात,त्यांचे लोकसंखेचे प्रमाण भारतात आणि महाराष्ट्रात किती आहेत याची माहिती मिळवली जाईल.अनुसूचीत जमाती मधील शिक्षणाचे प्रमाण काय आहे.पहिली पासून पदवीच्या शिक्षाणपर्यंत त्यांचे प्रमाण किती आहे याचे विश्लेषण केले जाईल.

प्रकरण दुसरे : संशोधन पद्धती व संबंधित साहित्याचा आढावा

ह्या मध्ये संशोधन पद्धती व या आधी अनुसूचीत जमातीमधील शिक्षणाबद्दल लिहिल्या गेलेल्या तसेच या विषयी संबंधित काही संशोधन तसेच साहित्याचा आढावा या प्रकरणात घेतला जाईल.

प्रकरण तिसरे : अनुसूचीत जमाती मधील पदवीत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचा सामाजिक,आर्थिक व राजकीय आढावा.(प्राथमिक तथ्याच्या विश्लेषनावर आधारित)

या मध्ये अनुसूचीत जमाती मधील पदवीत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांच्या सामाजिक,आर्थिक तसेच शैक्षणिक पार्श्वभूमी बद्दल माहिती मिळवली जाईल.

प्रकरण चौथे : अनुसूचीत जमाती मधील विद्यार्थ्यांना भेटत असलेल्या शासकीय योजना व लाभार्थींची परिस्थिति.(प्राथमिक तथ्याच्या विश्लेषनावर आधारित)

या मध्ये अनुसूचीत जमाती मधील शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना कोणत्या कोणत्या शासकीय योजना भेटतता.तसेच या योजनांचा किती टक्के विद्यार्थी फायदा घेतात याचा आढावा या प्रकरणात घेतला जाईल.

प्रकरण पाचवे : अनुसूचीत जमातीतील व्यावसायिक व पारंपारिक पदवीचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा तौलनिक अभ्यास.(प्राथमिक तथ्याच्या विश्लेषनावर आधारित)

या मध्ये अनुसूचीत जमाती मधील जे विद्यार्थी पारंपरिक व व्यावसायिक शिक्षण घेतात यांचा तौलनिक अभ्यास करून माहिती चे विश्लेषण केले जाईल

प्रकरण सहावे : निष्कर्ष व शिफारशी

या मध्ये जे काही संशोधन केले गेले आहे व माहितीचे जे विश्लेषण केले आहे तसेच गृहितकृत्यांची पडताळणी केली जाईल त्यावर निष्कर्ष दिले जातील व त्यावरून शिफारशी सुचवल्या जातील.

संदर्भ सूची

1) आगलावे प्रदीप(जानेवरी 2000)’संशोधन पद्धती शास्त्रे व तंत्रे’,विद्याप्रकाशन नागपुर.
2) गारे गोविंद(1976)’आदिवासी शिक्षण’,साकेत प्रकाशन,औरंगाबाद.
3) गवीत पुष्पा(2014)’आदिवासी संस्कृती:भाषा आणि साहित्य’,अथर्व प्रकाशन धुळे.
4) तेगमपुरे मरोती(2009)’आदिवासी विकास आणि वास्तव’,चिन्मय प्रकाशन,औरंगाबाद.
5) तुमराम विनायक(1994),’आदिवासी साहित्य,स्वरूप आणि समीक्षा’,विजय प्रकाशन,सीताबर्डी,नागपुर
6) Bose N.K(1971)’tribal life in india’,govt.publication,delhi
7) P.adinarayana reddy,D.uma devi,E.mahadeva reddy,sonali publication,(2010)’Tribal education problems and strategies’,firma KLM private limited.
8) आगलावे प्रदीप,(2019)’आदिवासी समाजाचे समाजशास्त्र’,हिमालया प्रकाशन.
9) गारे गोविंद(2014)’महाराष्ट्रातील आदिवासी जमती’,कॉन्टिनेन्टल प्रकाशन.
10) रायपुरे विनोद व देसाई संभाजी(2018)’आदिवासींची शैक्षणिक स्थिती’प्रशांत प्रकाशन,जळगाव.

(प्रस्तुत संशोधन आराखडा हा वरील बाबी नुसारच होईल असे नाही या मध्ये थोड्या फार प्रमाणात बादल होऊ शकतात)

मार्गदर्शक	***संशोधक***
डॉ.भिसे रामचंद्र मुंजाजी	***सचिन मावलीकर***
(एम.ए,एम.फिल,पीएच.डी,नेट)	***एम.ए(समाजशास्त्र)***

समाजशास्त्र विभाग प्रमुख,

दिगंबरराव बिंदू कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय भोकर जि.नांदेड